महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

जा.क्र. १०/एनजीपी/आदेश/२०२०/२/ १ दिनांक : 22 APR 2020

## आदेश

१. महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबीकरीता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, असाधारण क्रमांक ३४, दिनांक २१.८.२०१३, अन्वये, सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरीता व तत्संबंधित किंवा तदाअनुषंगीक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी हा अधिनियम करण्यात आलेला आहे.

२. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक १५२, दिनांक ७.११.२०१३ अन्वये महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ (सन २०१३ चा महा. २०) याच्या कलम ५ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने तंत्रशिक्षण विभागातील अभ्यासक्रमांच्या प्रयोजनासाठी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सक्षम प्राधिकारी म्हणून अधिसूचित केलेले आहे.

३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना, श्री. आदित्य राजन शिरोडकर, अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी, फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, कोथरुड व संगमवाडी, पुणे या संस्थांमध्ये अनधिकृतरित्या चालविण्यात येणाऱ्या कोर्सेसबाबत तक्रार प्राप्त झालेली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे स्तरावरुन व्दिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

४. सदर प्रकरणी चौकशी समितीने संबंधित संस्थांना प्रत्यक्ष भेट देवून चौकशी अहवाल कागदपत्रांसह दि. २.११.२०१९ रोजी त्यांच्या कार्यालयास सादर केलेला होता. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी सदर मुळ चौकशी अहवालाची प्रत सोबत जोडून या संचालनालयास दिनांक १६.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेली होती. सदर पत्रात नमूद करण्यात आलेले होते की, "प्राप्त चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता, संबंधित संस्थेंने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन, विद्यापीठ, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई अथवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची कोणत्याही प्रकारची मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.

सदर संस्थांमध्ये एकूण पाच प्रकारचे अभ्यासक्रम चालविण्यात येत असून, त्यापैकी चार पदविका अभ्यासक्रम हे एक वर्ष मुदतीचे असून, एक अभ्यासक्रम केवळ सहा महिने कालावधीचा आहे. सदर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रति अभ्यासक्रम रुपये ७८,०००/- ते १,५०,०००/- इतके शुल्क आकारण्यात येत असून, अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना जे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते, त्या प्रमाणपत्रावर Diploma Certificate

असे नमूद करण्यात आले असून, कोणत्याही प्रकारच्या नोंदीचा क्रमांक व दिनांक छापलेला आढळून आलेला नाही. याबाबत चौकशी समितीने संबंधित संस्थांकडे विचारणा केली असता, कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तर अथवा कागदपत्रे सादर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे फ्रँकफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग सेंटर (फ्रँकफिन एव्हिएशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड) सदर दोन्हीही संस्था अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अन्वये, पूर्वमान्यतेशिवाय अभ्यासक्रम चालवित असल्यामुळे, सक्तीची कार्यवाही करावी, अशी चौकशी समितीने शिफारस केलेली असून, त्यास सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी नमूद केलेले आहे की, सदर संस्था बंद करण्याबाबत कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस आहे."

५. सदर विषयाबाबत शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २५.६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये या संचालनालयास प्राप्त श्री. आदित्य राजन शिरोडकर, अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची तक्रार प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीमध्ये नमूद केलेले अभ्यासक्रम हे पदविका/ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम असल्याने संचालनालयामार्फत दिनांक २७.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना सदर प्रकरणी त्यांच्या स्तरावरुन चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत तसेच चौकशीचा अहवाल व केलेल्या कार्यवाहीचा अंतिम अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे यांच्या स्तरावर त्रिसदस्यीय समिती स्थापन करुन सदर समितीमार्फत चौकशी करुन समितीचा अहवाल त्यांच्या दिनांक ११.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये या संचालनालयास सादर केलेला होता. सदर अहवालाचे अवलोकन करुन खालील बाबी निदर्शनास आल्याचे मंडळ कार्यालयाने त्यांच्या पत्रात नमूद केलेले होते.

- फ्रँकफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअर होस्टेस ट्रेनिंग या संस्थेचे मुख्य कार्यालय, नवी दिल्ली येथे असून संस्थेची देशात अनेक अभ्यासकेंद्रे आहेत. पुण्यामध्ये दोन अभ्यासकेंद्रे असून बंडगार्डन रोड, पुणे येथे संस्थेची शाखा आहे व कोथरुड येथील अभ्यासकेंद्रे फ्रँचायसीतर्फे चालविले जाते.
- फ्रँकफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअर होस्टेस ट्रेनिंग यांचे प्राथमिक कर्तव्य हे एव्हिएशन, हॉस्पीटॅलिटी ट्रॅव्हल आणि कस्टमर सर्व्हिसेस या क्षेत्रामध्ये रोजगार मिळविण्याकरीता उमेदवारांना प्रशिक्षण देणे याकरीता मर्यादित असून यामध्ये कोणत्याही प्रकारचे तांत्रिक शिक्षण दिले जात नाही. तसेच हे अभ्यासक्रम पुर्ण केल्यांनतर विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे व उच्च शिक्षणासाठी या अभ्यासक्रमाचा उपयोग होत नाही असे उमेदवारांना कळविण्यात येते अशी संस्थेने समितीस माहिती दिली.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनीसुध्दा त्यांच्या दि. १० जुलै, २०१० च्या पत्रान्वये चिंचवड पोलीस स्टेशन, पुणे यांना फ्रँकफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअर होस्टेस ट्रेनिंग, पुणे या संस्थेमार्फत चालविण्यात येणारे अभ्यासक्रम त्यांच्या अखत्यारित येत नसल्याबाबत कळविले आहे.
- संस्थेमध्ये चालविण्यात येणारे अभ्यासक्रम अंशकालीन स्वरुपाचे असून दररोज दोन तास प्रशिक्षण दिले जाते. हे अभ्यासक्रम पुर्ण वेळ स्वरुपाचे नाहीत. सदर संस्थांमध्ये चालविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांचा व शिक्षण शुल्काचा तपशिल खालील प्रमाणे नमूद केलेला आहे.

  १. Frankfinn Post Graduate Diploma in Aviation and Hospitality Services (१२ Months)- शिक्षण शुल्क रु. १,९९,५००/- काही विद्यार्थ्यांना सीएसआर अंतर्गत शुल्कामध्ये सवलत देण्यात येते व रु. १,६५,०००/- फी आकारली जाते.

  २. Frankfinn Post Graduate Diploma in Airport Ground Services (१२ Months)- शिक्षण शुल्क रु. १,७६,६००/- काही विद्यार्थ्यांना सीएसआर अंतर्गत शुल्कामध्ये सवलत देण्यात येते व रु. १,३६,८००/- फी आकारली जाते.

  ३. Frankfinn Post Graduate Diploma in Aviation, Hospitality, Travel and Customer Service (६ Months) शिक्षण शुल्क रु. १,०१,०००/- फी आकारली जाते.

  ४. Frankfinn Diploma in Hospitality, Travel and Customer Service (१२ Months) - शिक्षण शुल्क रु. १,०२,५००/- काही विद्यार्थ्यांना सीएसआर अंतर्गत शुल्कामध्ये सवलत देण्यात येते व रु. ८५,०००/- फी आकारली जाते.

५. Frankfinn Diploma in Aviation, Hospitality and Travel Management (१२ Months) - शिक्षण शुल्क रु. १,९९,०००/- काही विद्यार्थ्यांना सीएसआर अंतर्गत शुल्कामध्ये सवलत देण्यात येते व रु. १,५०,०००/- फी आकारली जाते.

६. Frankfinn Certificate course in Hospitality Management (६ Months) — शिक्षण शुल्क रु. ५५,०००/- फी आकारली जाते व सवलत शुल्क रु. ४४,०००/-

६. सदर पत्रात समितीने दिलेले निष्कर्ष व अभिप्राय खालील प्रमाणे नमूद केलेले होते.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून तंत्रशिक्षण संस्था सुरु करण्यास आवश्यक असलेले सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा कलम ८, कंपनीज् ॲक्ट अंतर्गत सदर संस्थेने नोंदणी केलेली नाही.

परंतू ही संस्था महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम २०१७ (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग) तसेच कंपनीज् ॲक्ट १९७६ सेक्शन २१ अंतर्गत व्यवसाय आस्थापना म्हणून नोंदणीकृत आहे.

२. संस्थेने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची अभ्यासक्रम चालविण्याकरीता परवानगी किंवा कोणत्याही विद्यापीठ अथवा शिक्षण मंडळाची संलग्नता घेतलेली नाही.

३. संस्थेमध्ये महाराष्ट्र शासनाचा सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० अंतर्गत नमूद केलेल्या कोणत्याही समुचित प्राधिकरणाची मान्यता न घेता गेली अनेक वर्ष संस्था अभ्यासक्रम चालवित आहे.

४. संस्थेत National Skill Development Corporation (NSDC), New Delhi व Tourism and Hospitality Skill Council (THSC) यांचेकडून ट्रेनिंग पार्टनर म्हणून मान्यता आहे. परंतु विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांना एनएसडीसीची मान्यता आहे किंवा कसे याचा स्पष्ट खुलासा समितीस संस्थेकडून देण्यात आलेला नाही.

५. सदर संस्थेने चौकशी समितीच्या भेटीपुर्वी म्हणजे दि. १ डिसेंबर, २०१९ पासून अभ्यासक्रमाच्या प्रमाणपत्रावरील डिप्लोमा किंवा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमाचा उल्लेख काढून टाकलेला असून या सर्व अभ्यासक्रमांना "प्रमाणपत्र अभ्यासक्रम" असे बदललेले आहे. त्याची नोंद एनएसडीसीच्या संकेतस्थळावर केलेली आहे. परंतू गेली अनेक वर्ष सदर संस्थेकडून विद्यार्थ्यांना पदविका व पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत.

७. सदर प्रकरणाची वस्तुस्थिती व समितीच्या चौकशी अहवालातील निष्कर्ष व अभिप्राय विचारात घेवून महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी नमूद केलेले होते की, फ्रँकफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअर होस्टेस ट्रेनिंग, पुणे या संस्थेने National Skill Development Corporation (NSDC), New Delhi व Tourism and Hospitality Skill Council (THSC) यांची मान्यता निश्चित कोणते अभ्यासक्रम चालविण्याकरिता घेतलेली आहे याची स्पष्ट माहिती संस्थेने दिलेली नाही. तसेच संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांना पदविका प्रमाणपत्र देण्याकरीता कोणत्याही प्राधिकरणाची मान्यता घेतली नसल्याचे स्पष्ट होत आहे. संस्थेने स्वत:हून दि. १ डिसेंबर, २०१९ पासून अभ्यासक्रमाच्या प्रमाणपत्रावरील डिप्लोमा किंवा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमाचा उल्लेख काढून टाकलेला असून या सर्व अभ्यासक्रमांना "प्रमाणपत्र अभ्यासक्रम" असे जरी बदललेले असले तरी त्यापूर्वी संस्थेमार्फत पदविका प्रमाणपत्र देण्यात येत होते हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अनधिकृत शिक्षण संस्थांना पायबंद घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या "महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३" दि. २१.८.२०१३ मधील तरतुदी सदर प्रकरणी लागू होतात.

तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संचालनालयास विनंती केलेली होती की, सदर संस्था महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नीत नाही. त्यामुळे अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या कायद्यामध्ये कारवाई करण्याची तरतूद नाही. मात्र सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० अंतर्गत अशा संस्थांवर कारवाई करण्याची तरतूद आहे व त्याप्रमाणे संचालनालय स्तरावरुन उचित कार्यवाही करण्यात यावी.

८. सदर प्रकरणी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या चौकशी अहवालास अनुसरुन महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबीकरीता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, असाधारण क्रमांक ३४, दिनांक २१.८.२०१३, अन्वये सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरीता व तत्संबंधित किंवा तदाअनुषंगीक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम व महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक १५२, दिनांक ७.११.२०१३, मधील तरतूदींनुसार अध्यक्ष/ संचालक/ व्यवस्थापक, फ्रेन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांना तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई येथे दिनांक २१.१.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता या संचालनालयाचे दि. ६.१.२०२० रोजीच्या पत्रान्वये सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते.

९. दिनांक : २१.१.२०२० रोजीच्या सुनावणी दरम्यान उपरोक्त अहवालांबाबत मा. संचालक, तंत्रशिक्षण तथा सक्षम प्राधिकारी यांनी संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना विचारणा केली असता, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी सादर केलेल्या अहवालातील सर्व मुद्दे वस्तुस्थितीनुसार असून चौकशी समितीने मागणी केलेली फ्रेन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांच्या कोथरुड व संगमवाडी, पुणे या दोन्ही ठिकाणच्या संस्थेच्या अभ्यासकेंद्रामध्ये आजपर्यंत प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी, विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेले शुल्क, सदर शुल्क रोख स्वरुपात स्विकारण्यात आले किंवा चेकव्दारे, शिक्षण पुर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना कोणत्या उद्योगधंद्यामध्ये रोजगार मिळाला आहे त्या उद्योगधद्यांची व विद्यार्थ्यांची नावे, सद्यस्थितीत दोन्ही संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची यादी, मागील तीन वर्षांचे लेखापरिक्षीत आर्थिक ताळेबंद, सदर संस्थांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना समुचित प्राधिकरणाची मान्यता असल्याबाबतचे कागदपत्र इ. बाबतची माहिती दिली नसल्याचे नमूद केले. तसेच फ्रेन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) संस्थेने सुरु असलेल्या उपरोक्त अभ्यासक्रमांच्या नावात Diploma व Post Graduate Diploma ऐवजी Certificate असा बदल केल्याचे निदर्शनास आणून दिले. तथापि, हा बदल जाणीवपूर्वक फक्त एनएसडीसीच्या संकेतस्थळावर दाखविलेला असून यापुर्वी सदर संस्थेकडून प्रवेशित विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत पदविका व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत, सदर विद्यार्थ्यांची तसेच सद्यस्थितीत सदर अभ्यासक्रमास प्रवेशित व शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे सदर संस्थेमार्फत शैक्षणिक नुकसान व फसवणूक होत असल्याचे संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यानी नमूद केले.

१०. तसेच सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी सुध्दा त्यांनी सादर केलेल्या अहवालातील सर्व मुद्दे वस्तुस्थितीनुसार असून चौकशी समितीने मागणी केलेली फ्रेन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांच्या कोथरुड व संगमवाडी, पुणे या दोन्ही ठिकाणच्या संस्थेच्या अभ्यासकेंद्रामध्ये आजपर्यंत प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी, विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेले शुल्क, सदर शुल्क रोख स्वरुपात स्विकारण्यात आले किंवा चेकव्दारे, शिक्षण पुर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना कोणत्या उद्योगधद्यांमध्ये रोजगार मिळाला आहे त्या उद्योगधद्यांची व विद्यार्थ्यांची नावे, सद्यस्थितीत दोन्ही संस्थांमध्ये शिक्षण् घेत असलेल्या विद्यार्थ्यांची यादी, मागील तीन वर्षांचे लेखापरिक्षीत आर्थिक ताळेबंद, सदर संस्थांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना समुचित प्राधिकरणाची मान्यता असल्याबाबतचे कागदपत्र इ. याची माहिती दिली नसल्याचे व चौकशीसाठी गेलेल्या समितीस संस्थेने सहकार्य न केल्याचे नमूद केले.

११. दिनांक २१.१.२०२० रोजीच्या सुनावणीस फ्रेन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) या वतीने १. Shri Sanjay Gupta, VP-Legal. २. Shri. Harinder Jeet Singh, National Delivery & Placement Head व ३. Shri. R. K. Sharma, AVP Admin. हे उपस्थित होते. सदर सुनावणीच्या सुरवातीस मा.संचालक, तंत्रशिक्षण तथा सक्षम प्राधिकारी यांनी संस्थेच्या उपस्थित प्रतिनिंधीना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचा चौकशी अहवाल वाचून दाखविला.

तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांनी संस्थेच्या प्रतिनिधींकडून दोन वेळा फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांच्या कोथरुड व संगमवाडी, पुणे या संस्थेच्या दोन्ही अभ्यासक्रेंद्रांमध्ये आजपर्यंत प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी, विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेले शुल्क, सदर शुल्क रोख स्वरुपात स्विकारण्यात आले किंवा चेकव्दारे, शिक्षण पुर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना कोणत्या उद्योगधद्यांमध्ये रोजगार मिळाला आहे त्या उद्योगधद्यांची व विद्यार्थ्यांची नावे, सद्यस्थितीत दोन्ही संस्थांमध्ये शिक्षण् घेत असलेल्या विद्यार्थ्यांची यादी, मागील तीन वर्षांचे लेखापरिक्षीत आर्थिक ताळेबंद, सदर संस्थांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना समुचित प्राधिकरणाची मान्यता असल्याबाबतचे कागदपत्र इ. माहिती/ कागदपत्रांची मागणी केली. तसेच संस्थेच्या प्रतिनिधींनी विनंती केल्यानुसार मा. संचालक, तंत्रशिक्षण तथा सक्षम प्राधिकारी यांनी उपरोक्त दोन्ही चौकशी अहवालातील प्रमुख मुद्दे संस्थेच्या प्रतिनिधींना सांगितले.

१२.सदर सुनावणी दरम्यान उपस्थित असलेल्या संस्थांच्या प्रतिनिधींनी उपरोक्त नमूद कागदपत्र सादर केले नाहीत. उपस्थित प्रतिनिधींपैकी श्री शर्मा व श्री संजय गुप्ता यांनी फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांच्या कोथरुड व संगमवाडी पुणे येथील दोन्ही संस्थांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना National Skill Development Corporation (NSDC), New Delhi यांची मान्यता असलेबाबत कागदपत्र सादर करण्याकरीता दोन आठवडयांचा कालावधी देण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांना विनंती केली.

परंतू यापुर्वी सदर कागदपत्रांची मागणी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्याव्दारे गठित चौकशी समितीने दिनांक ५.७.२०१९ तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्याव्दारे गठित समितीने दिनांक ७.१२.२०१९ रोजी दिलेल्या भेटी दरम्यान केलेली होती. तरीही संस्थेने सदर माहिती दिनांक २१.१.२०२० रोजीच्या सुनावणीमध्ये सादर केलेली नसल्यामुळे सदर माहिती/ कागदपत्र सादर करण्यास फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) या संस्थेस कालावधी देणे उचित होणार नाही असे सर्वानुमते ठरले.सदर सुनावणीत फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांच्या कोथरुड व संगमवाडी पुणे येथील दोन्ही संस्थांमध्ये उपरोक्त नमूद ६ अभ्यासक्रम सुरु असल्याचे सुनावणी समितीमार्फत स्पष्ट करण्यात आले.

१३.तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्यांनी उपस्थित संस्थेच्या प्रतिनिधींना महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबीकरीता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, असाधारण क्रमांक ३४, दिनांक २१.८.२०१३, मधील तरतूदी समजावून सांगितल्या. तसेच सदर अधिनियमान्वये फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांच्या कोथरुड व संगमवाडी पुणे येथील दोन्ही संस्थांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना सदर अधिनियमात नमूद समुचित प्राधिकरणाची मान्यता नसल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच संस्था फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांच्या कोथरुड व संगमवाडी पुणे येथील दोन्ही संस्थांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना समुचित प्राधिकरणाची मान्यता सादर करु न शकल्यामुळे सदर दोन्ही संस्थांमध्ये सुरु असलेले अभ्यासक्रम अनधिकृत असल्याचे सिध्द होत आहे, ही बाब निदर्शानास आणून दिली.

याशिवाय संस्थेने दि. १ डिसेंबर, २०१९ पासून संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या नावातील डिप्लोमा किंवा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमाचा उल्लेख काढून त्याऐवजी या सर्व अभ्यासक्रमांना "प्रमाणपत्र अभ्यासक्रम" असे बदल केला, त्यावरुनही संस्थेत सुरु असलेले अभ्यासक्रम अनधिकृत असल्याची जाणीव संबंधीत संस्थेस असल्याचे निदर्शनास आणून दिले.

१४. सुनावणी दरम्यान सक्षम प्राधिकाऱ्यांनी पुनःश्च उपरोक्त नमूद माहिती/ कागदपत्रे सादर करण्याबाबत तसेच त्याव्यतिरिक्त संस्थेच्या प्रतिनिधींचे काही म्हणणे असल्यास ते मांडण्याबाबत उपस्थित संस्थेच्या प्रतिनिधींना

सांगितले. तथापि, फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) या संस्थेच्या प्रतिनिधींनी काहीही माहिती/ कागदपत्र सादर केली नाहीत.

१५. फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) या संस्थेने अशा प्रकारचे अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास "महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३" दिनांक २१.८.२०१३ मधील प्रकरण एक, कलम २ (च) मध्ये नमूद संबंधित समुचित प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) या संस्थेच्या प्रतिनिधीना सुनावणी दरम्यान वारंवार संधी देवूनही सदर संस्थेमार्फत सुरु असलेल्या पदविका/ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांना उपरोक्त नमूद समुचित प्राधिकरणांपैकी कोणत्याही समुचित प्राधिकरणाची मान्यता घेतल्याचे दस्तऐवज सदर संस्थेचे प्रतिनिधी सादर करु शकले नाहीत.

१६.तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या दिनांक १६.११.२०१९ व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचा दिनांक ११.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये संचालनालयास सादर करण्यात आलेल्या अहवालातील नमूद बाबी तसेच फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांना सुनावणी दरम्यान वारंवार संधी देवूनही त्यांच्यामार्फत चालविले जाणारे पदविका / पदव्युत्तर पदविका अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम यांना समुचित प्राधिकरणाची मान्यता असल्याबाबतचे दस्तऐवज सादर करू न शकल्यामुळे असे तांत्रिक पदविका अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे ही बाब "महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ दिनांक २१.८.२०१३" मधील प्रकरण दोन, कलम ३ मधील तरतूदींनुसार अनधिकृत ठरतात.

१७.तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या दिनांक १६.११.२०१९ व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचा दिनांक ११.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये संचालनालयास सादर करण्यात आलेल्या अहवालातील नमूद अभिप्राय तसेच फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांना सुनावणी दरम्यान वारंवार संधी देवूनही त्यांच्यामार्फत चालविले जाणारे पदविका/ पदव्युत्तर पदविका अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम यांना समुचित प्राधिकरणाची मान्यता असल्याबाबतचे दस्तऐवज सादर करू न शकणे या बाबी विचारात घेवून सुनावणी समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने "महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, असाधारण क्रमांक ३४, दिनांक २१.८.२०१३, सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरीता व तत्संबंधित किंवा तदानुषिंक बाबींकरिता तरतूद" करण्यासाठीच्या अधिनियमातील प्रकरण तीन मधील कलम ६ मधील तरतूदींव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश देत आहेत.

<u>संचालक तथा सक्षम प्राधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई</u>
<u>यांचे आदेश</u>

१. प्रकरण तीन, ६ (१) नूसार फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांच्या कोथरुड व संगमवाडी पुणे या संस्थेमार्फत सुरु असलेले अभ्यासक्रम १. Frankfinn Post Graduate Diploma in Aviation and Hospitality Services, २. Frankfinn Post Graduate Diploma in Airport Ground Services, ३. Frankfinn Post Graduate Diploma in Aviation, Hospitality, Travel and Customer Service, ४. Frankfinn Diploma in Hospitality, Travel and Customer Service, ५. Frankfinn Diploma in Aviation, Hospitality and Travel Management, ६. Frankfinn Certificate course in Hospitality Management हे सहा पदविका / पदव्युत्तर पदविका अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम तात्काळ बंद करण्याबाबतचे निर्देश देण्यात येत आहेत. तसेच सदर अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम बंद केल्याबाबतचा पुरावा तात्काळ या संचालनालयास सादर करावा.

२. प्रकरण तीन, ६ (२) पोट कलम (१) नूसार सदर अनधिकृत संस्था किंवा अनधिकृत अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रमांसाठी सद्यस्थितीत फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांच्या कोथरुड व संगमवाडी पुणे येथे प्रवेशीत असलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या प्रयोजनार्थ घेतलेली फी व अशा अन्य रकमा किंवा आकार आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या कालावधीत संबंधित विद्यार्थ्यांना परत करण्याचे निर्देश अध्यक्ष/ संचालक/ व्यवस्थापक, फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) यांना देण्यात येत आहेत. तसेच संबंधित विद्यार्थ्यांना फी व अशा अन्य रकमा किंवा आकार परत केल्यानंतर त्याबाबतचा पुरावा ७ दिवसांत सादर करावा.

३. प्रकरण तीन, ६ (४) पोट कलम (१) नूसार सदर प्रकरणाचे गांभीर्य, कालावधी व व्याप्ती पाहता फ्रॅन्कफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, पुणे (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune) या संस्थेस रुपये पाच लाख इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम "संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई" यांच्या नावे धनादेश/ धनाकर्षाव्दारे आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसात जमा करण्यात यावी.

४. तसेच सदर अधिनियमातील प्रकरण तीन ८(१) नूसार संबंधितांना सक्षम प्राधिकाऱ्यांच्या वर नमूद आदेशाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत उपसचिव, (तंत्रशिक्षण), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई — ३२ या अपील प्राधिकाऱ्यापुढे अपील करता येईल.

(डॉ. अभय वाघ)
संचालक तथा सक्षम प्राधिकारी,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
अध्यक्ष/ सचिव,
अध्यक्ष/ संचालक/व्यवस्थापक, फ्रॅकफिन इन्स्टिट्यूट ऑफ एअरहोस्टेस ट्रेनिंग, (Frankfinn Institute of Air Hostess Training, Pune), कॅनॉट प्लेस, तिसरा मजला, सीटीएस नं. २८,बंड गार्डन रोड, बीजी रोड,
पुणे-४११००१.

प्रत :

१. उपसचिव,
(तंत्रशिक्षण) तथा अपीलीय अधिकारी,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२. संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

३. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे.